वाचले:- १.महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम (सरकारी जमीनीची विल्हेवाट करणे )नियम १९७१ चे नियम ६.७त्तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र क्रमांक टीइसीएच/४७/३०३/एमबीआय/२०००,दिनांक ११/१०/२०००

२.म.उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांचेकडील पत्र क्रमांक २००५/गावठांण/कावि.१६०१.दिनांक २/१/२००६

३.म.मानद सचिव ,आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक संस्था नवापुर यांचा अर्ज दिनांक १७/९/२००४

---

क्रमांक २००५/ब/कक्ष-२/गावठांण/कावि-
जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार
नंदुरबार दिनांक:- ३/१/२००६

**आदेश,**

मानद सचिव, आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक संस्था, अनुदानित आश्रमशाळा गडद यांनी मौ.गडद तालुका नवापुर जिल्हा नंदुरबार येथील गावठांणपैकी क्षेत्र ३७७४.७५चौ.मी. पैकी अनुदानित आश्रमशाळा गडद या शैक्षणिक संस्थेस क्रिडागणासाठी १७०० चौ.मी. क्षेत्राची मागणी केलेली आहे. त्यानुसार तहसिलदार नवापुर यांनी प्रस्ताव सादर केला आहे.

मौ गडद तालुका नवापुर जिल्हा नंदुरबार येथील गावठांणपैकी जागा मानद सचिव आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक संस्था नवापुर , अनुदानित आश्रमशाळा गडद यांना वितरीत करणे बाबत ग्रामपंचायत गडद तालुका नवापुर यांनी दिनांक २९/५/२००४ अन्वयं संमतीदर्शक ठराव दिलेला आहे.

वरील संस्थेने क्रिडागणासाठी १७०० चौ.मी. जमीनीची मागणी केलेली आहे. त्या बाबत मोजणी नकाशा पानांक १२९ वर सामील आहे. प्रश्नाधिन क्षेत्र उपरोक्त संस्थेस वितरीत करणे बाबत तहसिलदार नवापुर व उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांनी शिफारस केलेली आहे.

उपरोक्त विवेचनावरुन मी जिल्हाधिकारी नंदुरबार मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र जमीन महसुल (सरकारी जमीनीची विल्हेवाट करणे ) नियम १९७१ चे नियम ७ अन्वये **क्रिडागंणासाठी १७०० चौ.मी. क्षेत्र प्रतिवर्षी नाममात्र भाडे १ रुपया आकारुन १५ वर्ष भाडे पटयांने** उक्त संस्थेस या आदेशाच्या दिनांकापासुन खालील अटी व शर्तीवर मंजुर करीत आहे.

➢ **अटी व शर्ती**

१. क्रिडागण हे सर्व जाती धर्माचे विद्यार्थ्यांना वापरणेस संस्थेकडुन कोणतीही अट घालणेत येणार नाही.

२. जागेचा वापर क्रिडागणा शिवाय इतर प्रयोजनार्थ करता येणार नाही. सरंक्षक भिंत व्यतिरिक्त कुठल्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

३. मुदलवाढ काळात संस्थेस शैक्षणिक विभागाकडुन सलग मान्यता न मिळाल्यास प्रस्तुत आदेश रद्द समजण्यात येतील.

४. क्रिडागणाची जागा अन्य कोणासही बक्षीस /गहाण/विक्री अथवा अन्य मार्गाने हस्तांतरण करता येणार नाही. विल्हेवाट लावता येणार नाही.

५. संस्थेने ३० दिवसाचे आत विहीत नमुना नंबर २ मध्ये सनद मंजुर करुन घ्यावी.

६. तात्परता अथवा कायम स्वरुपात ज्या ज्या वेळी शासनास उक्त जागेची आवश्यकता असेल त्या त्या वेळी

७. प्रस्तुतचे आदेश कोणत्याही क्षणी विनासुचना मागे घेणे / संस्थेकडुन जमीन काढुन घेणे इत्यादी अधिकार शासनाने राखुन ठेवलेले आहे.

८. वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास जागेचा ताबा संस्थेकडुन काढण्यात येईल त्या पोटी कोणताही मोबदला दिला जाणार नाही.

**स्वाक्षरीत/-**
**(जयंत गायकवाड)**
**जिल्हाधिकारी नंदुरबार .**

प्रत:- मा.मानद सचिव, आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक संस्था नवापुर तालुका नवापुर

प्रत:- म.उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित.

प्रत:- म.तहसिलदार नवापुर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाही साठी रवाना.

२/- उपरोक्त आदेश बाबत गावचे दप्तरी आवश्यक त्या फेरफार नोंदी घेण्यात याव्यात व दुरुस्त उतारे अवलोकनार्थ सादर करावे. आदेशातील शर्तीचे उल्लंघन होणार नाही या बाबत योग्य ती दक्षता घ्यावी. सोबत मुळ संचिका पानांक १ ते १५१ अभिलेखार्थ परत करण्यात येत आहे.

**जिल्हाधिकारी नंदुरबार करीता.**

जिल्हाधिकारी
नंदुरबार